*राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक २४०१/२०२४/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. विष्णु सुदाम पंडीत,<br>रा. मु. साताळी, पो. चिचोंडी,<br>ता. येवला, जि. नाशिक. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, साताळी,<br>ता. येवला, जि. नाशिक. | विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),<br>पंचायत समिती, येवला,<br>ता. येवला, जि. नाशिक. |

**द्वितीय अपिल सुनावणी दिनांक — ११/०३/२०२५**

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| २५/१०/२०२३ | २५/१०/२०२३ | ०९/०५/२०२४ | ०४/०३/२०२४ | ०४/०३/२०२४ | २३/०४/२०२४ |

अपिलार्थी यांनी दि. २९/०५/२०२४ रोजीच्या अर्जान्वये "चुकीची माहिती दिली, मागितलेली माहिती न देता दुसरीच माहिती दिली." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपील अर्जाद्वारे कोणतीही विनंती केलेली नाही.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी वगळता सर्व पक्षकार उपस्थित आहेत.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे सन २०२० पासुन ते सन २०२३ पर्यंत या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

१. सन २०२० पासुन ते सन २०२३ पर्यतचे मासिक मिंटीग व ग्रामसभेच्या प्रोसिडींगच्या सर्व छायांकित प्रति मिळाव्यात.

२. आपल्या ग्रामपंचायतच्या सन २०२०-२१ व २०२१ ते २०२२ व अलिकडच्या कालावधीत केलेल्या लेखा परिक्षण अहवालाची छायाप्रत तसेच नमुना २७ व नमुना ३० माहिती अधिकारात मिळण्याबाबत.

३. ग्रामपंचायत दप्तर नमुना नं. २७ लेखा परिक्षणातील अक्षेपाचे मासिक विवरणाची छायाप्रत द्यावी.

४. ग्रामपंचायत दप्तर नमुना नं. ३० ग्रामपंचायत लेखा परिक्षण अक्षेपाचे पूर्तता नोंदणी छायाप्रत देण्यात यावी.

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये " माहिती देण्यास टाळाटाळ करणे." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

५. सुनावणीवेळी उपस्थित अपिलार्थी यांनी लेखी निवेदन देवून असे नमूद केले की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नाही. तसेच ग्रामसभा व मासिक मिटींगचे बरेचसे कागदपत्र दिले नाही. तथापि, कोणती माहिती अपूर्ण मिळाली व कोणती चुकीची माहिती दिली याबाबत अपिलार्थींना काहीही सांगता आले नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की,अपिलार्थी यांना दि. ०९/०५/२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध माहिती पुरविली असून, त्यावर अपिलार्थी यांनी माहिती मिळाली अशी पोहोच दिली आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक २४०१/२०२४/नाशिक निकाली काढण्यात येत आहेत.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

जावक क्र. 2604 15 APR 2025